**महाराष्ट्र शासन**

**उच्च शिक्षण संचालनालय**

**शिक्षण शुल्क समिती, मुंबई**

(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)

कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१
Web:www.sssmumbai.org Tel-022 22694478 E-mail : sssbedmed@gmail.com/jd.hesss-mh@gov.in

**विषय:- दि.०९.०१.२०२० रोजी सायं ०४:०० वाजता मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती तथा मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ४ था माळा, मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई यांच्या दालनामध्ये पार पडलेल्या शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीचे इतिवृत्त ..**

**सदर बैठकीस खालील अधिकारी/पदाधिकारी उपस्थित होते:-**

| अ.क्र. | उपस्थित अधिकारी/ पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.श्रीमती सुचिता महाडीक, उपसचिव, वित्त विभाग, मा.सचिव, वित्त विभाग, मंत्रालय यांचे प्रतिनिधी | **सदस्य** |
| २ | मा. डॉ. धनराज माने- संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | **सदस्य सचिव** |
| ३ | मा. श्रीमती रोहिणी भालेकर, उप सचिव, उच्च शिक्षण, मंत्रालय | **विशेष निमंत्रित** |
| ३ | डॉ. संगीता पकडे, प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई | **सदस्य** |
| ४ | श्री. संतोष परब, सनदी लेखापाल | **सदस्य** |
| ५ | श्रीमती नलिनी पाटील, खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शिक्षणशास्त्र) | **सदस्य** |
| ६ | डॉ. रोहिदास काळे, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई | **सदस्य** |
| ७ | श्रीमती ज्ञानदा कदम, प्रशासकीय अधिकारी, शिक्षण शुल्क समिती, मुंबई | |

डॉ. रविंद्र कडू, खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी ( शारीरिक शिक्षणशास्त्र) व डॉ. तुकाराम गाढवे, तज्ज्ञ हे बैठकीला अनुपस्थित होते.

**या बैठकीत घेण्यात आलेले महत्त्वाचे मुद्देनिहाय निर्णय खालीलप्रमाणे :-**

१. **मुद्दा क्र. १ शिक्षण शुल्क समितीने २०१६-१७ मध्ये निश्चित केलेले शिक्षण शुल्क शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रथमत: अंतरिम शुल्क म्हणून आणि तदनंतर यथावकाश अंतिम शुल्क म्हणून शिक्षण शुल्क समितीने मंजूर करणे.**

:- **अ.** राज्यातील विनाअल्पसंख्यांक विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांकडून शै वर्ष २०१९-२०२० करिता शिक्षण शुल्क निश्चितीसाठी प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यामध्ये ३०५ महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर केले. परंतू राज्यात ओढावलेल्या प्रथमत: कोरडा दुष्काळ आणि तदनंतर झालेल्या प्रदिर्घ अतिवृष्टी या अभूतपूर्व नैसर्गीक आपत्तीमुळे राज्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होवून आर्थिक टंचाईचे संकट ओढावले आहे. शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्यांमध्ये बहुतांश विद्यार्थी शेतकरी व शेतमजूर कुटूंबातील आहेत. या अपवादात्मक पार्श्वभूमीवर समितीने शै. वर्ष २०१९-२० करिता शिक्षण शुल्क न वाढविण्याच्या निर्णयाबाबत सखोल चर्चा केली. आणि सदर सविस्तर चर्चेनंतर समितीच्या उपस्थित सदस्य व अध्यक्ष यांच्या सहमतीनंतर पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला. शै. वर्ष २०१६-१७ करिता शिक्षण शुल्क समितीने राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित **शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांसाठी निर्धारित केलेले शिक्षण शुल्क अपवादात्मक परिस्थिती म्हणून शै. वर्ष २०१९-२०२० या केवळ एकाच वर्षाकरिता अंतिम शुल्क म्हणून निश्चित/निर्धारित करण्यात येत आहे.**

**ब.** उपरोक्त निर्णय फक्त २०१९-२०२० करिता लागू असल्याने शै. वर्ष २०२०-२१ करिता पुन:श्च नवीन प्रस्ताव महाविद्यालयांकडून न मागविता प्राप्त झालेल्या प्रस्तावांची पडताळणी/तपासणी आर्थिक वर्ष २०१९-२०२० च्या लेखापरिक्षण अहवालाच्या आधारे करून २०२०-२१ ते २०२२-२३ करिता शिक्षण शुल्क समितीने राज्यातील विनाअल्पसंख्यांक विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना शिक्षण शुल्क निर्धारित करून दयावे.

**२. मुददा क्र.०२ आजतागायत राज्यातील ज्या शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र (Non Minority) महाविद्यालयांनी शिक्षण शुल्क समितीकडून शिक्षण शुल्क निर्धारित करून घेतलेले नाही आणि प्रस्तावही सादर केलेला नाही, अशा महाविद्यालयांना शै. वर्ष २०१९-२०२० साठी शासन निर्णय दिनांक १९.०९.२०१६ व शासन निर्णय दिनांक २७.१०.२०१६ नुसार शिक्षण शुल्क निर्धारित करण्यास मंजूरी देणे.**

:- राज्यातील ज्या शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र (Non Minority) महाविद्यालयांची मान्यता एन.सी.टी.ई.ने रदद केलेली नाही आणि संबंधित अकृषीविद्यापीठांनी संलग्नीकरण दिलेले आहे, अशा विषयांकीत ज्या महाविद्यालयांनी आजतागायत शिक्षण शुल्क समितीकडून शुल्क निश्चित करून घेतलेले नाही किंवा त्याबाबतचे प्रस्ताव सुध्दा सादर केलेला नाही, अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर शिक्षण शुल्काचा आर्थिक भार येवू नये म्हणून अशा महाविद्यालयांचे शै.वर्ष २०१९-२०२० साठी अनुक्रमे शासन निर्णय १९.०९.२०१६ व दि.२७.१०.२०१६ नुसार शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांसाठी एकुण शुल्क रू. २०७४०/- (रू. १०३७०/- प्रतिवर्ष शिक्षण शुल्क) तसेच शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांसाठी एकूण शुल्क रू.६०००/- (रू.३०००/- प्रतिवर्ष शिक्षण शुल्क) एवढे शिक्षण शुल्क महाडीबीटी पोर्टलवर मंजूर करून देणेबाबत निर्णय झाला.

**३. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय:-**

१. :- शै. वर्ष २०१९-२० मधील एकुण नोंदणीकृत महाविद्यालयांपैकी ३०५ महाविद्यालयांनी शिक्षण शुल्क समितीकडे प्रस्ताव सादर केले आहेत. उर्वरित १३२ (प्र.नि.प्रा. च्या यादीनूसार) महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर केले नसल्याने त्यांची एन.सी.टी.ई.ची मान्यता व विद्यापीठाचे संलग्नीकरण व अनुषंगीक इतर अभिलेखांची पडताळणी करून संबंधीत महाविद्यालयांना प्रस्ताव सादर न केल्याबाबत खुलासा मागवून पुढील प्रवेशाच्या केंद्रियभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश न करण्याबाबत तसेच संबंधित महाविद्यालयांचे संलग्निकरण रदद करण्याबाबतच्या कार्यवाहीसाठी मा. सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती तथा मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रवेश नियामक प्राधिकरण यांना महाविद्यालय अहवाल सादर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

२. :- राज्यातील ज्या शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र (Non Minority) महाविद्यालयांची मान्यता एन.सी.टी.ई.ने रदद केलेली नाही आणि संबंधित अकृषी विद्यापीठांनी संलग्नीकरण

दिलेले आहे, अशा विषयांकीत ज्या महाविद्यालयांनी आजतागायत शिक्षण शुल्क समितीकडून शुल्क निश्चित करून घेतलेले नाही किंवा त्याबाबतचे प्रस्ताव सुध्दा सादर केलेला नाही, अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती लाभ कोणत्या दराने मंजूर करावेत, यासाठी अशाप्रकारे साधर्म्य असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना शुल्क नियामक प्राधिकरणाकडे विचारणा करून समितीच्या पुढील बैठकीत अहवाल ठेवण्यात यावा.

३. ज्या महाविद्यालयांना खाजगी विद्यापीठाचा दर्जा प्राप्त झाला आहे, अशा खाजगी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवर पोर्टलवर शिष्यवृत्ती मंजूर करू नये.

मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या परवानगीने बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव,
शिक्षण शुल्क समिती
तथा
संचालक, उच्च शिक्षण, पुणे

अध्यक्ष,
शिक्षण शुल्क समिती
तथा
सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई